**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६३/२०१६-१७/१६२ दिनांक: २७.०४.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ६३/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जयेंद्र रामू माणगांवकर :<br>मु. पो. खंडेराजूरी<br>ता. मिरज, जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग सांगली | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग मिरज ग्रामिण-१ | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) उपरोक्त तक्रारदार यांनी सदर गा-हाणे, त्यांना निश्चित कालावधीत शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळावी, विलंबाची भरपाई प्रति आठवडा १०० रु. मिळावी आणि सुपरव्हीजन चार्जेस ५० रु. अनधिकृतपणे वसूल केले असल्यास ते सव्याज परत मिळावेत यासाठी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) तक्रारदार यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळण्यासाठी वि.प. यांच्या संबंधीत कार्याल्यात रितसर अर्ज सादर करुन दि. ३०.०६.२०१६ रोजी आवश्यक ती रक्कम भरणा केली (नवीन ग्राहक क्र. २७९५५५००८४०१ ) कृती मानके विनियमातील तरतूदीप्रमाणे त्यांना तीन महिन्यात नविन वीज जोडणी देणेत आली नाही. त्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दिनांक ३१.१२.२०१६ रोजी तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि. १४.०२.२०१७ रोजी निर्णय करुन, तक्रारदार यांना जेष्ठता यादीनुसार वीज पुरवठा करणेत येईल असा आदेश केला. त्यावर नाराज होऊन प्रस्तुत अपिल तक्रारदार यांना या मंचासमोर दिनाक १४.०३.२०१७ रोजी दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) वि.प. यांचे प्रामुख्याने असे म्हणणे आहे की, वरीष्ठ कार्यालयाचे दि. ०४.०६.२०१३ च्या पत्रानुसार आदेश आहेत की, जेष्ठता यादीप्रमाणे नविन ग्राहकांना वीज जोडण्या देणेत याव्यात. तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी लघुदाब वाहिनी उभारणेची आवश्यकता आहे. त्यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिक्षा यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल.

४) सदर प्रकरणाची सुनावणी मंचासमोर दि. १८.०४.२०१७ रोजी घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि वि.प.तर्फे श्री पी.के. ठाकूर अतिरिक्त कार्यकरी अभियंता व श्री एस. एस. जाधव, प्रभारी उपकार्यकारी अभियंता हे हजर होते. या सर्वाचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले आहेत. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना निश्चित कालावावधीमध्ये शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार यांना वीज जोडणी देण्यात झालेल्या विलंबासाठी भरपाई देणेचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- मागणी सोडून देणेत आली आहे.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी त्यांना कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज वि.प. कडे सादर करुन दि.३०.०६.२०१६ रोजी रु. १,६५०/- जमा केले याबद्दल वाद नाही. त्यांना वीज पुरवठा देणेसाठी लघुदाब वाहिनी उभारण्याची आवश्यकता आहे. त्याना तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे नियमानुसार आवश्यक होते. तक्रारदार यांचा जेष्ठता यादीमध्ये २८४ वा क्रमांक आहे. त्यांनी सुपरव्हीजन चार्जेस ५० रु. वसूल केल्याबाबत तक्रार केली असली तरी त्याबाबत त्यांचेतर्फे कोणताही युक्तिवाद त्याबाबत करण्यात आला नाही. त्यामुळे सुपरव्हीजन चार्जेसबद्दल विचार करण्याची मंचास आवश्यकता वाटत नाही. विलंबाच्या भरपाईची मागणी मात्र तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी युक्तिवादाचे वेळी सोडून दिली आहे.

७) कृति मानके विनियमाप्रमाणे तक्रारदार याना तीन महिन्यात नविन वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. सदर तरतूदीनुसार जर मुदतीत वीज पुरवठा देणेत आला नाही तर पुढे होणा-या विलंबासाठी प्रति आठवडा १०० रु.भरपाई देणेत यावी असे नमूद केले आहे. इतकेच नाही तर विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) यामध्ये वितरण परवाना धारकास दंड ठोठावण्याची तरतूद केंद्र शासनाने केली आहे. नविन वीज जोडण्या देणे बाबतीत जर वितरण कंपनीस अडचणी येत असतील तर त्याचे निवारण मा. विद्युत नियामक आयोगाकडून करुन घेणे अनिवार्य आहे. प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य किंवा जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देणे या तत्वांचा वापर या ठिकाणी करता येत नाही. सदर तत्वे, वर नमूद केलेल्या कायद्यामधील कठोर तरतूदीपुढे गौण ठरतात.

८) वरील कारणांस्तव तक्रारदार हे निश्चित कालावधीत नविन वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत. प्रतिक्षा यादीत त्यांचा क्रमांक बराच खाली आहे. या कारणा वरुन त्यांची तक्रार अमान्य करता येत नाही.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार श्री जयेद्र रामू माणगांवकर, मु.पो. खंडेराजूरी ता. मिरज जि. सांगली यांना शेती पंपासाठी त्यांच्या मागणी अर्जाप्रमाणे नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. ३१.०७.२०१७ पर्यन्त द्यावी असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) तक्रारदार यांच्या अन्य मागण्या, त्या सोडून दिल्यामुळे ,रद्द करण्यात येतात.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |